# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** "किमान वेतन कायदा १९४८" मा. उच्च न्यायलयाचे प्रकरण **{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** क्रं.३१३४/२०१७ दि. १४/३/२०१८ ठराव क्रं. ३६१ दि. ०२/०३/२०२२ अन्वये मनपातील सफाई कामगारांना (ऐवजदारांना) दि २४/२/२०१५ ते दि. १५/०४/२०१६, पर्यंतच्या कालावधीतील वेतनाच्या फरकाची रक्कम २४ हप्त्यामध्ये देणे बाबत मंजुरी मिळालेली आहे. व २४ हप्त्यामध्ये राशी देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तसेच ज्या सफाई कामगारांनी मा. सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडे खटला दाखल केलेला होता त्यांना प्रथम यादी ८६६ व द्वितीय यादी ४३३ असे एकुण १२९९ ऐवजदार कामगार यांना एकमुस्त रक्कम देणे ची प्रक्रिया सुरु आहे.

परंतु ज्या ऐवजदार सफाई कामगारांना २४ हप्ते मध्ये राशी देणे आहे त्यापैकी काहीचा मृत्यु झालेला आहे व काही सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे मृतकाच्या वारसदारांना व सेवानिवृत्त ४८० सफाई कामगार ऐवजदारांना तसेच यापुढे हि मृतक/ सेवानिवृत्त होणारे ऐवजदार कामगारांना फरकाची राशी एकमुस्त देणे बाबत प्रस्तावित आहे.

त्यामुळे मृतकाच्या वारसदारांना व सेवानिवृत्त ऐवजदार सफाई कामगाराला फरकाची राशी एकमुस्त देणे बाबत चा विषय मा. प्रशासक यांची मंजुरीस्तव सादर.

**टिप** :- सविस्तर माहिती नस्ती मध्ये उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 435/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 26/06/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार "किमान वेतन कायदा १९४८" मा. उच्च न्यायलयाचे प्रकरण क्रं.३१३४/२०१७ दि. १४/३/२०१८ ठराव क्रं. ३६१ दि. ०२/०३/२०२२ अन्वये मनपातील सफाई कामगारांना (ऐवजदारांना) दि २४/२/२०१५ ते दि. १५/०४/२०१६, पर्यंतच्या कालावधीतील वेतनाच्या फरकाची रक्कम २४ हप्त्यामध्ये देणे बाबत मंजुरी मिळालेली आहे. व २४ हप्त्यामध्ये राशी देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तसेच ज्या सफाई कामगारांनी मा. सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडे खटला दाखल केलेला होता त्यांना प्रथम यादी ८६६ व द्वितीय यादी ४३३ असे एकुण १२९९ ऐवजदार कामगार यांना एकमुस्त रक्कम देणे ची प्रक्रिया सुरु आहे.

परंतु ज्या ऐवजदार सफाई कामगारांना २४ हप्ते मध्ये राशी देणे आहे त्यापैकी काहीचा मृत्यु झालेला आहे व काही सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे मृतकाच्या वारसदारांना व सेवानिवृत्त ४८० सफाई कामगार ऐवजदारांना तसेच यापुढे हि मृतक/ सेवानिवृत्त होणारे ऐवजदार कामगारांना फरकाची राशी एकमुस्त देणे बाबत प्रस्तावित आहे.

त्यामुळे मृतकाच्या वारसदारांना व सेवानिवृत्त ऐवजदार सफाई कामगाराला फरकाची राशी एकमुस्त देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**

**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**